।। श्री ।।

# सौदेपावती करारनामा

सदरचा सौदापावती करारनामा, मौजे मेहरूण शिवारातील, जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव, सिटी सर्व्हे जळगाव, सब-रजिस्ट्रेशन ऑफिस, जळगाव यांचे हद्दीतील, फ्लॅट सिस्टीमचे इमारतीतील, **'साई सफायर'** मधील, फ्लॅट घरजागेचा, सामाईक सुखसोईतील अविभाज्य हिश्याचे वापर हक्कांसह. किंमत रूपये ---------------------------------------- --- चा. आज **दिनांक ..... माहे -------------, सन २०१७** रोजी जळगाव मुक्कामी लिहून दिला असे.

______________________________
______________________________
______________________________
______________________________

} **लिहून घेणार**

***यांना***

**श्री.काशिनाथ मोतीराम तळेले**
उ.व. ८२ वर्षे, धंदा- व्यापार
**PAN : AAHPT 6825F**
**AADHAR NO. 2683 8549 7767**
यांचे तर्फे जनरल मुखत्यार म्हणून..
**श्री.नितीन काशिनाथ तळेले,** उ.व.४८,
धंदा- व्यापार, दोघांची वस्ती : प्लॉट नं. २०,
गणेशवाडी, जळगाव, ता. व जि. जळगाव.

**लिहून देणार**

**कारणे सौदापावती करारनामा लिहून देतोत की,**

माझे संपूर्ण मालकीची, कब्जे उपभोगातील, स्वसंपादीत खालील सविस्तर वर्णन केलेली स्थावर मिळकत, फ्लॅट सिस्टीमचे इमारतीतील, **'साई सफायर'** मधील ------- मजल्यावरील फ्लॅट नंबर ......... ची फ्लॅट घरजागा, सामाईक सुखसोईतील अविभाज्य हिश्याचे मालकी व वापर हक्कांसह. मी तुम्हांस रक्कम रूपये ---------------- --------------------- **मात्र** कायमस्वरूपी पूर्ण मालकी हक्काने खुश खरेदी देवून तुमचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत व ताब्यात देण्याचा सौदा आज रोजी पक्का केला. **त्या स्थावर मिळकत फ्लॅट घरजागेचे वर्णन-**

तुकडी जिल्हा जळगाव, पोटतुकडी तालुका जळगाव, सब-रजिस्ट्रेशन ऑफिस जळगाव पैकी मौजे मेहरूण शिवारातील, जळगाव

शहर महानगरपालिका जळगाव व विस्तारीत क्षेत्र सिटी सर्व्हे जळगाव यांचे हद्दीतील, **(विभाग क्र. ७/२१९ मधील प्रती चौ.मी. रू. २३,९५०/- मात्र प्रमाणे)**

**मेहरूण शेत सर्व्हे नंबर ४७२/३** यांत मे.जिल्हाधिकारी साहेब, जिल्हा जळगाव यांचेकडील बिनशेती आदेश क्रमांक : एल.एन.ए./ एस.आर./५७९, दिनांक ११.०७.१९६६ नुसार व त्यांनी मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे प्लॉटस् पाडलेले आहेत. त्या प्लॉटांपैकी :-

**प्लॉट नंबर ३०** (तीस) यास विस्तारीत क्षेत्र सिटी सर्व्हे जळगाव नुसार **नगरभूमापन क्रमांक ६३८६** दिलेला असून त्याचे एकूणात **क्षेत्र ४८७.८ चौ.मी.** आहे. **यांस लांबी-रूंदी** :- पूर्व बाजू- २२.८६ मीटर, पश्चिम बाजू- २२.८६ मीटर, उत्तर बाजू- २१.३४ मीटर, दक्षिण बाजू- २१.३४ मीटर आहे. यांस चतु:सिमा- **पूर्वेस-** प्लॉट नंबर २९ (सि.स.नं. ६३६२), **पश्चिमेस-** प्लॉट नंबर ३१ (सि.स.नं. ६३८७), **उत्तरेस**- प्लॉट नंबर ४३ (सि.स.नं. ६३८८, ६३८५, ८६८४), **दक्षिणेस-** ७.६२ मीटर रूंदीचा रोड.

सदर वर सविस्तर वर्णन केलेल्या प्लॉट जागेवर वाढीव क्षेत्राचे बांधकाम करणेकामी दिनांक १६.०१.२०१२ रोजी दस्त क्रमांक २७३ नुसार लिलाधर जगन्नाथ खडके व इतर सहमालक वगैरे यांचेतर्फे जनरल मुखत्यार म्हणून स्काय स्पेस क्रिएशन चे भागीदार महेश सुरेशचंद्र दायमा यांचेकडून मौजे जळगाव शेत सर्व्हे नंबर १०१/१+१०१/२+१०१/३अ पैकी आरक्षित झालेल्या क्षेत्राचे मोबदल्यात लाभ क्षेत्र हस्तांतरणीय विकास हक्क (डी.आर.सी. क्र. ०९, दिनांक १५.०४.२००८) 'बी' झोन टी.डी.आर. क्षेत्रापैकी विक्री केलेले क्षेत्र वजा जाता शिल्लक राहिलेल्या

क्षेत्रापैकी १९५.१० चौरस मीटर क्षेत्राचा टी.डी.आर. खरेदी घेतलेला आहे.

अशा रीतीने वर सविस्तर वर्णन केलेल्या चतु:सिमेतील लांबी-रूंदीचे प्लॉट जागेवर मी लिहून देणार यांनी मे.आयुक्त सो. जळगाव शहर महानगरपालिका जळगाव यांचेकडील बांधकाम परवानगी पत्र क्रमांक : टी.पी./बी.पी./०५८७, दिनांक ०५.११.२०१४ नुसार व त्यांनी मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे स्टिल्ट मजला, स्टिल्ट तळमजला, पहिला मजला, दुसरा मजला व तिसरा मजला याप्रमाणे एकूणात १० (दहा) फ्लॅट मिळकतींचे बांधकाम केलेले आहे व सदरचे संपूर्ण बांधकामास **'साई सफायर'** असे नाव दिलेले आहे. त्या इमारतीतील बांधकामापैकी :-

**------- मजल्यावरील फ्लॅट नंबर ....... (---------) याचे एकूण बांधीव क्षेत्र ............ चौरस मीटर** असून **कारपेट क्षेत्र ---------- चौरस मीटर** असून **तळजमिनीतील अविभाज्य क्षेत्र** ............ चौरस मीटर आहे. यांत ---------------------------------------------------------------------------------------------------------------- असे बांधकाम केलेले आहे. सदर फ्लॅट जागेत इलेक्ट्रीक फिटींग व नळ फिटींग मी करून दिलेली आहे. मात्र त्यास लागणारे इलेक्ट्रीक मीटर कनेक्शन व पिण्याचे पाण्याचे कनेक्शन तुम्ही लिहून घेणार यांनी तुमचे स्वखर्चाने घ्यावयाचे आहे. तसेच सदरचे फ्लॅट घरजागेसाठी पार्कींग ही मी लिहून देणार यांनी अलॉट केल्याप्रमाणे राहावयाची आहे. तसेच सदरचे दस्तासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-'अ'** मध्ये नमूद केलेल्या सामाईक क्षेत्र व सुविधा ह्या

इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांसाठी सामाईकात दिलेल्या असून त्यात उपरोक्त फ्लॅट जागेचा ...........% अविभाज्य हिस्सा आहे. तो तुम्हांस कधीही विभागून मागता येणार नाही त्यासह. यांस चतु:सिमा- **पूर्वेस-** ----------------------, **पश्चिमेस-** ------ -------------------, **उत्तरेस-** ---------------- ---- आणि **दक्षिणेस-** ---------------------------.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील फ्लॅट जागा, आतील दरवाजे, खिडक्या, इलेक्ट्रीक फिटींग, नळ फिटींग तसेच **'साई सफायर'** या इमारतीसाठी असलेल्या सामाईक सुखसोईतील अविभाज्य हिश्याचे मालकी, वापर हक्कांसह व तदंगभूत वस्तुंसह मी तुम्हांस रक्कम रूपये -------- ---------------------------------------- **मात्र** व कायमस्वरूपी पूर्ण मालकी हक्काने खुश खरेदी देवून तुमचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत व ताब्यात देण्याचा सौदा आज रोजी पक्का केला. सदरची फ्लॅट घरजागा, सामाईक सुखसोईतील अविभाज्य हिश्याचे मालकी व वापर हक्कांसहचा सोईकरिता **'सदर फ्लॅट मिळकत'** म्हणून खाली संबोधित केलेली आहे. त्या फ्लॅट मिळकतीबाबतच्या भरण्याचा व शर्तींचा तपशील :-

रू. अक्षरी रूपये ---------------------- ------------------------------ ----------

रू. /- अक्षरी रूपये --------------------- मात्र तुम्ही आम्हांस **दिनांक** ----------

चे दिवशी किंवा त्याआधी खरेदीखत लिहून व नोंदवून देण्यापूर्वी द्यावयाचे आहे.

रू. /- एकूण अक्षरी रूपये -------------
----------------

**येणेप्रमाणे सौदा ठरला. त्या सौद्याच्या अटी व शर्ती :-**

१) सदर वर सविस्तर वर्णन केलेली फ्लॅट मिळकत मे.कलेक्टर साहेब जळगाव, शहर महानगरपालिका जळगाव, टाऊन प्लॅनिंग जळगाव, सिटी सर्व्हे जळगाव व सब-रजिस्ट्रेशन ऑफिस जळगाव व **'साई सफायर'** यांचे हद्दीतील आहे. सबब त्यांचेकडील सर्व हुकूम, नियम, अटी व शर्ती खरेदीखतानंतर मालक व कब्जेदार म्हणून तुमचेवर बंधनकारक राहतील.

२) सदर फ्लॅट सिस्टीमचे इमारतीतील तुम्हास खरेदी दिलेल्या फ्लॅट मिळकतीचा वापर तुम्ही इतर फ्लॅट धारकांना त्रास होणार नाही अशा रितीने रहिवासासाठी करावयाचा आहे. तसेच सदर फ्लॅट सिस्टीमचे इमारतीस धोका पोहचेल किंवा तिच्या मूळ स्वरूपात फरक पडेल असे कोणतेही बदल तुम्हांस करता येणार नाही. तसेच सदर इमारतीचा बाह्य शो व डिसेन्सी यांत बदल होईल असे कोणतेही बदल तुम्हांस करता येणार नाही.

३) सदर फ्लॅट सिस्टीम इमारतीचे तळजमिनीत तुमचे फ्लॅट जागेचा ...........% अविभाज्य हिस्सा आहे व तो तुम्हांस कधीही विभागून मागता येणार नाही.

४) सदर **'साई सफायर'** साठी असलेल्या सामाईक सुखसोईंचे दुरूस्ती, सुधार, बिघाड, मेन्टेनन्ससाठी लागणारा सामाईकातील खर्च तुम्ही हिस्सेराशीने नियमितपणे वेळचेवेळी असोसिएशनला द्यावयाचा आहे. व सदर इमारतीतील सामाईक सुखसोई, चालू व सुस्थितीत ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांसोबत तुमची सुद्धा आहे व राहील.

५) सदर उपरोक्त फ्लॅट मिळकतीबाबतचे बिनशेती कर, महानगरपालिका कर व इतर सर्व शासकीय व निमशासकीय कर खरेदीखतापावेतो मी लिहून देणार यांनी भरावयाचे आहे. मात्र त्यानंतर येणारे वरील कर मालक व कब्जेदार म्हणून तुम्ही लिहून घेणार यांनी भरावयाचे आहे.

६) सदर उपरोक्त फ्लॅट जागेचे खरेदीखत मी तुम्हांस **दिनांक** -------------- चे दिवशी किंवा त्याआधी तुमचेपासून भरण्यात नमूद केल्याप्रमाणेची संपूर्ण रक्कम मला मिळालेनंतर तुमचे नावाने लिहून व नोंदवून देईन व त्याच दिवशी सदर फ्लॅट जागेचा प्रत्यक्ष कब्जा तुम्हांस देईल.

७) दिनांक ------------ रोजी किंवा त्याआधी तुम्ही मला भरण्यात नमूद केल्याप्रमाणेची रक्कम देणे व मी तुम्हांस सदर फ्लॅट जागेचे खरेदीखत लिहून व नोंदवून तुमचे प्रत्यक्ष कब्जात देणे ही या सौदापावती करारातील महत्त्वाची अट आहे व जो कोणी या अटीचा भंग करेल तो दुसऱ्या १८% प्रमाणे व्याज व नुकसानी देण्यास पात्र राहील. तसेच सदरचे मुदतीत बाकी राहिलेली रक्कम

तुम्ही मला न दिल्यास तुम्हांस एक महिन्याची नोटीस देण्यात येईल व एक महिन्यानंतरही सदर राहिलेली रक्कम व त्यावरील व्याज न दिल्यास ठरलेल्या संपूर्ण रकमेपैकी १५% रक्कम जप्त करण्यात येईल व सदरचा सौदापावती करारनामा एकतर्फी रद्द समजण्यात येईल व तुम्ही दिलेल्या रकमेपैकी बाकी राहिलेली रक्कम सदरचा फ्लॅट पुन्हा विक्री झालेवर तुम्हांस परत करण्यात येईल.

८) सदर **'साई सफायर'** या इमारतीतील सर्व धारकांसाठी लिहून देणार यांनी सामाईकात एक इलेक्ट्रीक मीटर कनेक्शन जसे- सामाईक वापराची जागा, पार्कींग, जिना वगैरे ठिकाणी दिवे लावणे कामी, बोअरवेलचे पाणी गच्चीवरील पाण्याचे टाकीत लिफ्ट करणेकामी दिलेले आहे. सबब सदरचे सामाईकात दिलेल्या इलेक्ट्रीक मीटरचे वेळचेवेळी येणारे इले.बील इमारतीतील सर्व धारकांनी मिळून हिस्सेराशीने भरावयाचे आहे व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांवर आहे व राहील.

९) सदर **'साई सफायर'** या इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांसाठी लिहून देणार यांनी लिफ्टची व त्यांस अनुसरून इन्व्हर्टर बॅटरी बॅकअपसहची सुद्धा व्यवस्था करून दिलेली आहे. सबब सदर लिफ्ट कामी येणारा सुधार, बिघाड, दुरूस्ती खर्च, तसेच इन्व्हर्टर बॅटरी बॅकअपचे मेन्टेनन्सचा खर्च वगैरे इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांनी सामाईकात हिस्सेराशीने करावयाचा आहे. सबब त्याबाबत काही एक जबाबदारी मी लिहून देणार यांचेवर नाही व पुढेही राहणार नाही.

१०) सदर उपरोक्त प्लॉट जागेवर मी लिहून देणार यांनी एकूणात १० (दहा) फ्लॅट मिळकतींचे बांधकाम केलेले असून सदरचे संपूर्ण बांधकामास **'साई सफायर'** असे नाव दिलेले आहे. सदर इमारतीबाबतचे घोषणापत्र दिनांक १०.११.२०१४ रोजी दस्त क्रमांक ३५७४ नुसार महाराष्ट्र वेश्म मालकी अधिनियम व महाराष्ट्र वेश्म मालकी नियम यांचे तरतुदीनुसार मे.सब-रजिस्ट्रार जळगाव-३ यांचे कार्यालयात नोंदविलेले आहे सदर **'साई सफायर'** साठी अपार्टमेन्ट ओनर्स असोसिएशन स्थापन झालेली आहे. सबब सदर असोसिएशनचे नियम, अटी व शर्ती खरेदीखतानंतर तुमचेवर बंधनकारक राहतील.

११) सदर **'साई सफायर'** चे नोंदणीकृत केलेल्या घोषणापत्रात नमूद केल्याप्रमाणेच्या सामाईक क्षेत्र व सुविधा हे इमारतीतील सर्व धारकांवर बंधनकारक आहे व राहील. सबब त्याबाबत काही एक हरकत घेता येणार नाही.

१२) सदरची फ्लॅट जागा आज रोजी पूर्ण झालेली आहे. सबब सदर फ्लॅट जागेचे खरेदीखत लिहून व नोंदवून घेण्यापूर्वी सदर फ्लॅट मिळकतीचे अवलोकन करावयाचे आहे व त्याकामी अवलोकन केल्यानंतर सदर फ्लॅट जागा सुस्थितीत असल्याची तुमची खात्री झाल्यानंतर सदर फ्लॅट जागेचे खरेदीखत लिहून नोंदविले जाईल व त्यानंतर मात्र सदर फ्लॅट जागेत कोणत्याही प्रकारची दुरूस्ती करावी लागल्यास किंवा लिकेज-ब्रेक्रेज याकामी येणारा संपूर्ण खर्च तुम्ही लिहून घेणार यांनीच करावयाचा आहे. त्याबाबतची कोणतीही

जबाबदारी लिहून देणार यांचेवर नाही व पूढेही राहणार नाही.

१३) सदर सौदेपावतीसाठी व पुढे होणारे खरेदीखत याकामी येणारा संपूर्ण खर्च जसे- मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, कॉम्प्युटर चार्जेस, झेरॉक्स व इतर अनुषंगिक खर्च तसेच सदर इमारतीचे घोषणापत्रासाठी येणारा सामाईकात खर्च वगैरे तुम्ही लिहून घेणार यांनीच करावयाचा आहे.

१४) सदरचे सौदेपावती करारनामा आम्ही लिहून देणार व आमचे वंशवालीवारस, भाऊबंद, नातेवाईक यांचेवर तसेच तुम्ही लिहून घेणार व तुमचे वंशवालीवारस, नातेवाईक, भाऊबंद यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

१५) सदर वर सविस्तर वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीच्या किमंतीत सर्व्हीस टॅक्स, व्हॅट टॅक्स, एल.बी.टी., जी.एस.टी. वा अन्य कोणतेही तत्सम टॅक्सेस अंतर्भूत नाहीत. सबब वरील प्रमाणेचे काही एक टॅक्सेस भरावे लागल्यास ते भरण्याची सर्वस्वी जबाबदारी तुम्ही लिहून घेणार यांचीच आहे व राहील व त्याबाबतचे कराची रक्कम खरेदीखत लिहून व नोंदवून देण्यापूर्वी मी लिहून देणार यांचेकडे रोखीने/चेकने जमा करणे लिहून घेणार यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

१६) लिहून देणार यांनी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) अंतर्गत सदर **'साई सफायर'** हा प्रकल्प नोंदणी क्रमांक ................ दिनांक ................. रोजी महारेरा अधिकारी यांचेकडे नोंदणीकृत केलेला आहे.

१७) सदर प्रस्तुत दस्तामध्ये भविष्यात काही एक सुधार किंवा अतिरिक्त अटी व शर्ती नमूद करावयाच्या असतील तर लिहून देणार व लिहून घेणार यांच्यामध्ये सामंजस्याने व सहमतीने ते करतील.

१८) सदर **'साई सफायर'** या इमारतीतील फ्लॅट मिळकतींचे विक्री बाबतचे जनरल मुखत्यारपत्र श्री.काशिनाथ मोतीराम तळेले यांनी श्री.नितीन काशिनाथ तळेले यांचे नावाने दिनांक १०.११.२०१४ रोजी दस्त क्रमांक ३५७५ नुसार सब-रजिस्ट्रार, जळगाव-३ यांचे कार्यालयात लिहून व नोंदवून दिलेले आहे. व सदरचे मुखत्यार पत्र हे आजही अस्तित्त्वात आहे.

१९) सदर वर सविस्तर वर्णन केलेली स्थावर मिळकत फ्लॅट घरजागा ही बाजार मूल्य दर तक्ता २०१७-१८ चे विभाग क्रमांक ७/२१९ मध्ये समाविष्ट केलेली आहे. सदरचे विभागानुसार फ्लॅट जागेचा दर रूपये २७,२००/- असा आहे. सदर फ्लॅट मिळकतीचे एकूण क्षेत्र ............. चौरस मीटर आहे. व त्यानुसार सदर फ्लॅट घरजागेची किंमत ही ..................../- येते. परंतु सदरचे सौदापावती करारातील प्रत्यक्ष मोबदल्याची रक्कम रूपये ............./- आहे. सबब सदर सदरचे सौदापावती करारास मुंबई स्टॅम्प ॲक्ट, १९५८ चे कलम २५ नुसार हजारी ६० प्रमाणे स्टॅम्प रूपये एकूण ................/- मात्र ई-स्टॅम्प द्वारे दिलेले आहे व नोंदणी फी साठी रक्कम रूपये ............/-

मात्रच्या ई-चलनाची प्रत सदरच्या दस्तासोबत दिलेली आहे.

येणेप्रमाणे तुमचेपासून भरण्यात नमूद केल्याप्रमाणेची भरणा रक्कम मिळाली. हा सौदापावती करारनामा राजीखुशीने, स्वसंतोषाने, समजून-उमजून, वाचून घेऊन, उभय साक्षीदारांसमक्ष सह्या करून, पान क्रमांक १ वर नमूद केलेल्या तारखेस  जळगाव मुक्कामी लिहून दिले असे. *(टाईपसेट बाय-ओम कॉम्प्युटर्स, जळगाव)*

**श्री.काशिनाथ मोतीराम तळेले**
यांचे तर्फे जनरल मुखत्यार म्हणून..

**श्री.नितीन काशिनाथ तळेले**
लिहून देणार

---------------------------

लिहून घेणार

**- साक्षीदार -**

| | |
|---|---|
| १) | २) |
| नाव | नाव |
| पत्ता | पत्ता |

# घोषणापत्र

मी, **नितीन काशिनाथ तळेले,** राहणार : जळगाव, तालुका व जिल्हा जळगाव याद्वारे घोषित करतो की, सह.दुय्यम निबंधक वर्ग-२, जळगाव-३ यांचे कार्यालयात खरेदीखत या शिर्षाकाचा दस्त नोंदणीसाठी सादर करण्यात आला आहे. श्री.काशिनाथ मोतीराम तळेले यांनी दिनांक १०.११.२०१४ रोजी दस्त क्रमांक ३५७५ नुसार सह दुय्यम निबंधक वर्ग-२, जळगाव-३ यांचे कार्यालयात करून दिलेल्या जनरल मुखत्यारपत्राच्या आधारे मी सदरचा दस्त नोंदणीसाठी सादर केलेला आहे / निष्पादीत करून कबुली जबाब दिला आहे. सदर मुखत्यारपत्र लिहून देणार यांनी मुखत्यारपत्र रद्द केलेले नाही किंवा मुखत्यारपत्र लिहून देणार यांचेपैकी कोणीही मयत झालेले नाही किंवा अन्य कारणांमुळे मुखत्यारपत्र रद्दबातल ठरलेले नाही. सदरचे मुखत्यारपत्र पूर्ण वैध असून उपरोक्त कृती करणेस मी पूर्णत: सक्षम आहे. सदरचे कथन चुकीचे आढळून आल्यास नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ अन्वये शिक्षेस पात्र राहील. याची मला जाणीव आहे.

**नितीन काशिनाथ तळेले**

जनरल मुखत्यारपत्र धारक

# ANNEXURE-'A'

## COMMON AREAS & FACILITIES

- Piece and parcel of land bearing PLOT No.30 which has given CITY SURVEY No.6386 situated at previous SURVEY No. 472/3 of MEHRUN SHIWAR, Tal & Dist. Jalgaon.
- Parking Area as shown in the Plan.
- Septic Tank on Ground Floor will be common for all Flat owners in the said building.
- A Staircase which leads from Ground Floor to the Top of the Building is common for all Owners in the said building.
- Area below Staircase will be common for all Owners in the said building.
- One Underground Water Storage Tank with pipe fitting will be common for all owners in the said building.
- One Overhead Water Storage Tank will be common for all Owners in the said building.
- Plumbing network through out the building in common area will be common for all Owners.
- Electric wiring network through out the building in common area will be common for all owners.
- Necessary Light connections through out the building in common areas will be common for all Owners.
- Drainage lines through out the, building will be common for all Owners.

- The foundations, Main Walls, Columns, Beams, Girders and roof of the building as described in the Plan which from a Part of this Deed.
- Compound wall with Entrance Gate on Southern side will be common for all Owners.
- One Bore-Well with Electric Pump, Pannel Board & Pipe fittings will be common for all Owners in the said building.
- Municipal Drinking Water Connection common for said building.
- One 3-Phase Electric Meter connection common for all Owners in the said building for the purpose of common use.
- All the Open ducts in the said building will be common for all Flat owners in the said building
- The Terrace of the Building will be common for all Flat Owners in the said building.
- Lift with Inverter-Battary-Back-up and Lift room in the said building will be common for all Flat Owners in the said building.